संवर्धन कोणाचे केले जाते? ज्यांचे अस्तित्व धोक्यात आहे त्यांचे संवर्धन करावे लागते. संवर्धन करणे म्हणजे आपली भाषा धोकादायक उंबरठ्यावर आहे असे आपण स्वतः मान्य करण्यासारखेच आहे. जागतिकीकरण, शैक्षणिक बदल, विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास, वेगाने वाढणारे शहरीकरण, परप्रांतियांचा प्रवेश, नोकरी व व्यावसायिक कारणाने होणारे स्थलांतर इत्यादी घटक मातृभाषा व बोलीभाषेचे मारेकरी असतात. याला मराठी भाषाही अपवाद नाही. अशा स्थितीत मराठी भाषा व संस्कृतीचा नव्या पिढीला विसर पडत आहे. आजचा युवक मोबाईलचा वापर, संगणक-तंत्रज्ञानाचा उपयोग, पाश्चात्य जीवनशैलीचे अनुकरण यामुळे आपली मातृभाषा व संस्कृतीपासून दुरावत चालला आहे. यावरून संस्कृती लोप पावत चालली आहे. अशा परिस्थितीत मराठी भाषा संवर्धन करण्यासंबंधीचे परिपत्रक काढण्याची वेळ येणे स्वाभाविक आहे. मात्र हे चिंताजनक आहे. यामुळे मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे जतन करण्यासाठी असे विविध उपक्रम घेणे अपरिहार्य ठरते. शासनादेशाच्या अनुषंगाने सध्या सर्वत्र मोठ्या उत्साहाने विविध उपक्रमांनी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. वाचनालये, शाळा-महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय - निमशासकीय कार्यालये, सामाजिक संस्था यांच्या वतीने निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, कवीसंमेलन, कथाकथन, व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, मुलाखती, साहित्यिकांचा परिचय, पुस्तक परिचय अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जात आहे. एकूणच मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यावर सर्व अंगाने या पंधरवड्याच्या निमित्ताने व्यापक विचार मंथन घडून येत आहे. मराठी भाषेचे असलेले वैभव नव्या पिढीला या माध्यमातून आकर्षित करीत असल्याचे दिसून येत आहे. शालेय विद्यार्थी, युवक-युवती या उपक्रमात स्पर्धक- वाचक- प्रेक्षक अशा विविध भूमिकेतून सहभागी होत आहेत.



अनेक मराठी साहित्यिक, संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, समीक्षक, भाषा अभ्यासक यांनी मराठी भाषेची परंपरा, मराठी भाषा: उद्गम आणि विकास, साहित्य, संस्कृती, बोलीभाषा, बालसाहित्य, नाट्य वाङ्मय, साहित्य समीक्षा, मराठी समाजजीवन, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, मराठी भाषेचे भवितव्य अशा विविध विषयावर व्यापक, मूलगामी चिंतन व सखोल मार्गदर्शन करीत असल्याचे दिसून येत आहे. ऑनलाइन व ऑफलाईन माध्यमातून होणाऱ्या कवी संमेलनांना भरपूर प्रतिसाद मिळत आहे. मराठी भाषा संवर्धनाच्या उपक्रमासाठी व्हाट्सअप, टेलिग्राम, गुगल फॉर्म, झूम मिटिंग, गुगल मिट, युट्युब, फेसबुक पेज यांचा सक्षमपणे वापर होत आहे. ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. मराठी माणसाचे कर्तृत्व व साहित्याचे श्रेष्ठत्व जगभर पोहोचविण्यासाठी आपण अन्य भाषा अवगत करणे ही काळाची गरज आहे. या विविध चर्चासत्र, परिसंवाद, मुलाखती, व्याख्यानमाला यातून मराठी भाषा व साहित्याची स्थिती-गती, भविष्यकालीन वाटचाल व शासनाच्या मराठी भाषा विषयक भूमिका व धोरणासंबंधी व्यापक मूलगामी चिंतन - मंथन केले जात आहे. हे सर्व उपक्रम अत्यंत आश्वासक व मराठीचे वैभव टिकविण्यास - वाढविण्यास उपयुक्त ठरत आहेत. यात मराठी भाषा व संस्कृतीचे अनुकरण करणे, भाषेचा ठेवा जपणे हे केवळ आपण सर्वांनी या पंधरवड्यापुरतेच न करता आयुष्यभर मराठी भाषेच्या पदराखाली राहून या भाषेचा मान सन्मान वाढविणे आवश्यक आहे. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. मराठी जनता या माध्यमातून भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करीत आहे. शासनानेही आणखी व्यापक प्रयत्न करायला हवेत. मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसंदर्भात शासनाने ठोस कृती करण्याची गरज आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे अत्यंत गरजेचे आहे. भाषा हा आपल्या अस्मितेचा व सन्मानाचा विषय आहे. मराठी भाषा व साहित्य संशोधनासाठी राज्यशासनाने संशोधन वृत्ती सुरू करणे गरजेचे आहे. यामुळे भाषेच्या व्यापक संशोधनास मदत होणार आहे. राज्य शासनाने मराठी भाषेच्या लघु शोध प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मराठी वाचनालयांच्या अनुदानात वाढ करणे, वाचनालयांना अन्य सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मराठी भाषेत अभिजात दर्जाचे साहित्य उपलब्ध आहे. हे साहित्य अन्य भाषेत भाषांतरित होणे गरजेचे आहे, यासाठी भाषांतरित साहित्यास चालना (अनुदान) देणे गरजेचे आहे. सर्व कार्यालयामध्ये मराठीचा वापर करण्यासंबंधी सक्ती केली पाहिजे. प्रादेशिक रेल्वे कार्यालय, न्यायालय, बँक यात अद्यापही मराठी भाषेचा समाधानकारक वापर होत नाही. महाराष्ट्र-कर्नाटक सिमावर्ती भागातील मराठी भाषा व संस्कृती जपणाऱ्या माणसांची अस्मिता जपणे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी केंद्रशासनावर सिमाप्रश्न सोडविण्यासाठी दबाव आणणे इ. कार्य करणे आवश्यक आहे. मातृभाषा ही केवळ भाषा नसून आपल्या संस्कृतीचा आत्मसन्मानाचा भाग आहे. म्हणून मराठी भाषेची दिव्य विश्वव्यापी पताका अखंडपणे उंच फडकावण्याचे ध्येय मनाशी बाळगून सर्वांनी सदैव प्रयत्नशील राहू या.

ePaper देशोन्नती Wed, 26 January 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65843198

# 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा': भाषेस नवसंजीवनी देणारा उपक्रम

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दि. १४ ते २८ जानेवारी या दरम्यान विविध उपक्रमांनी साजरा करण्यासंबंधी प्रतिवर्षी शासनादेश काढण्यात येतो. या अनुषंगाने राज्यभर विविध उपक्रम घेतले जात आहेत. खरे पाहता अशी भाषा संवर्धनाची वेळ येणे ही बाब आपल्या भाषेसाठी भूषणावह नाही. संवर्धन कोणाचे केले जाते? ज्याचे अस्तित्व धोक्यात आहे त्याचे संवर्धन करावे लागते. संवर्धन करणे म्हणजे आपली भाषा धोकादायक टप्प्यावर आहे असे आपण स्वतः मान्य करण्यासारखेच आहे.

जागतिकीकरण, शैक्षणिक बदल, विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास, वेगाने वाढणारे शहरीकरण, परप्रांतियांचा प्रवेश, नोकरी व व्यावसायिक कारणाने होणारे स्थलांतर इत्यादी घटक मातृभाषा व बोलीभाषेचे मारेकरी असतात. याला मराठी भाषाही अपवाद नाही. अशा स्थितीत मराठी भाषा व संस्कृतीचा नव्या पिढीला विसर पडत आहे. आजचा युवक मोबाईलचा वापर, संगणक- तंत्रज्ञानाचा उपयोग, पाश्चात्य जीवनशैलीचे अनुकरण यामुळे आपली मातृभाषा व संस्कृतीपासून दुरावत चालला आहे. त्यातून संस्कृती लोप पावत चालली आहे. अशा परिस्थितीत मराठी भाषा संवर्धन करण्यासंबंधीची परिपत्रके काढण्याची वेळ येणे स्वाभाविक आहे. मात्र हे चिंताजनकही आहे. यामुळे मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे जतन करण्यासाठी असे विविध उपक्रम घेणे अपरिहार्य ठरते.

शासनादेशाच्या अनुषंगाने सध्या सर्वत्र मोठ्या उत्साहाने विविध उपक्रमांनी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. वाचनालये, शाळा-महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय - निमशासकीय कार्यालये, सामाजिक संस्था यांच्या वतीने निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, कवीसंमेलन, कथाकथन, व्याख्यानमाला, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, मुलाखती, साहित्यिकांचा परिचय, पुस्तक परिचय अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जात आहे. एकूणच मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यावर सर्व अंगाने या पंधरवड्याच्या निमित्ताने व्यापक विचार मंथन घडून येत आहे. मराठी भाषेचे असलेले वैभव नव्या पिढीला या माध्यमातून आकर्षित करीत असल्याचे दिसून येत आहे. शालेय विद्यार्थी, युवक-युवती या उपक्रमात स्पर्धक- वाचक- प्रेक्षक अशा विविध भूमिकेतून सहभागी होत आहेत. अनेक मराठी साहित्यिक, समीक्षक, शिक्षक, प्राध्यापक, संपादक, भाषा अभ्यासक यांनी मराठी भाषेची परंपरा, मराठी भाषा : उद्गम आणि विकास, साहित्य, संस्कृती, बोलीभाषा, बालसाहित्य, नाट्य वाङ्मय, साहित्य समीक्षा, मराठी समाजजीवन, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, मराठी भाषेचे भवितव्य अशा विविध विषयावर व्यापक, मूलगामी चिंतन व सखोल मार्गदर्शन करीत असल्याचे दिसून येत आहे.

ऑनलाइन व ऑफलाईन माध्यमातून होणाऱ्या कवीसंमेलनांना भरघोस प्रतिसाद मिळत आहे. मराठी भाषा संवर्धनाच्या उपक्रमासाठी व्हाट्सअप, टेलिग्राम, गुगल फॉर्म, झूम मिटिंग, गुगल मिट, युट्युब, फेसबुक पेज यांचा सक्षमपणे वापर होत आहे. ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. मराठी भाषकांचे कर्तृत्व व साहित्याचे श्रेष्ठत्व जगभर पोहोचण्यासाठी आपण अन्य भाषा अवगत करणे ही काळाची गरज आहे.

या पंधरवड्यात घेण्यात आलेल्या विविध उपक्रमातून मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचा वैभवशाली ठेवा नव्या- जुन्या पिढीला मराठी भाषेची गोडी व ओढ निर्माण करणारा ठरत आहे. विविध चर्चासत्र, परिसंवाद, मुलाखती, व्याख्यानमाला यातून मराठी भाषा व साहित्याची स्थिती- गती, भविष्यकालीन वाटचाल व शासनाच्या मराठी भाषा विषयक भूमिका व धोरणासंबंधी व्यापक मूलगामी चिंतन - मंथन केले जात आहे. हे सर्व उपक्रम अत्यंत आवश्यक व मराठीचे वैभव टिकविण्यास - वाढविण्यास उपयुक्त ठरत आहेत. मात्र मराठी भाषा व संस्कृतीचे अनुकरण करणे, भाषेचा ठेवा जपणे हे केवळ आपण सर्वांनी या पंधरवड्यापुरतेच न करता आयुष्यभर मराठी भाषेच्या पदराखाली राहून या भाषेचा मान सन्मान वाढविणे आवश्यक आहे. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. मराठी जनता या माध्यमातून भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करीत आहे. शासनानेही आणखी व्यापक प्रयत्न करायला हवेत. मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसंदर्भात शासनाने ठोस कृती करण्याची गरज आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे अत्यंत गरजेचे आहे. भाषा हा आपल्या अस्मितेचा व अभिमानाचा विषय आहे. मराठी भाषा व साहित्य संशोधनासाठी राज्यशासनाने संशोधन वृत्ती सुरू करणे गरजेचे आहे. यामुळे भाषेच्या व्यापक संशोधनास मदत होणार आहे. राज्य शासनाने मराठी भाषेच्या लघु शोध प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मराठी वाचनालयांच्या अनुदानात वाढ करणे, वाचनालयांना अन्य सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

मराठी भाषेत अभिजात दर्जाचे साहित्य उपलब्ध आहे. हे साहित्य अन्य भाषेत भाषांतरीत होणे गरजेचे आहे. यासाठी भाषांतरित साहित्यास प्रोत्साहन (अनुदान) देणे गरजेचे आहे. सर्व कार्यालयांमध्ये मराठीचा वापर करण्यासंबंधी सक्ती केली पाहिजे. प्रादेशिक रेल्वे कार्यालय, न्यायालय, बँक यात अद्यापही मराठी भाषेचा समाधानकारक वापर होत नाही. यासाठी शासनाने ठोस कृती करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र- कर्नाटक सिमावर्ती भागातील मराठी भाषा व संस्कृती जपणाऱ्या भाषकांची अस्मिता जपणे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी केंद्रशासनावर सिमाप्रश्न सोडविण्यासाठी दबाव आणणे इ. कार्य करणे आवश्यक आहे. मातृभाषा ही केवळ भाषा नसून आपल्या स्वाभिमान आत्मसन्मानाचा भाग आहे. म्हणून मराठी भाषेची दिव्य वैभवशाली परंपरा अखंडपणे अशीच उज्ज्वलतेचे पर्व पुढे वाढवून आपण सर्वांनी सदैव प्रयत्नशील राहू या. हे यानिमित्ताने सुचवितो.



प्रा. डॉ. प्रशांत भंडे
मराठी विभागप्रमुख,
कै. रसिका महाविद्यालय देवणी

आज़ादी का अमृत महोत्सव

दैनिक राजधर्म

Epaper.rajdharma.in

RNI NO : 39513/81

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणारच:प्रा.डॉ.प्रशांत भंडे

**सोनपेठ,प्रतिनिधी:**येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय येथे मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२२ दरम्यान संपन्न होत आहे. या निमित्ताने सहा दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन केले असून आज तिसरे पुष्प गुंफताना प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी वरील विचार मांडले.सुरुवातीला त्यांनी अभिजात भाषा मिळण्यासाठी कोणते निकष आहेत ते सांगून मराठी भाषा ही सर्व निकष पूर्ण करते हे सोदाहरण सांगितले . राज्यशासनाची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले, प्रसिद्ध साहित्यिक रंगनाथ पठारे व हरी नरके यांच्यासह अन्य सदस्यांची मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली. या समितीने २०१३ मध्ये राज्य शासनास अहवाल सादर केला आहे. साहित्य अकादमीने देखील एक मताने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा अशी शिफारस केंद्रासरकार केली आहे. परंतु केंद्र सरकार याबाबत लवकर निर्णय घेत नाही. मराठी भाषेबद्दल वेळकाढूपणा करत आहे. अशी खंत त्यांनी व्यक्त केली. कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा ही प्राचीन असावी लागते. त्या भाषेत दर्जेदार साहित्यनिर्मिती झाली पाहिजे व आधुनिक भाषा व तिचे प्राचीन रूप यात साधर्म्य असावे लागते. हे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करते हे सांगून तिचे प्राचीनत्व सांगताना त्यांनी राजा हालसातवाहन (गाथासप्तशती), दंडी, पाणिनी, वररूची आदि ग्रंथकारांचे लेखन, शिलालेख व ताम्रपट याचे संदर्भ देऊन मराठी भाषा ही कशी दीड ते दोन



हजार वर्षांपूर्वीची प्राचीन आहे हे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर मराठीत ज्योतिराव फुले, अण्णाभाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विंदा करंदीकर, पु. ल. देशपांडे, बाबुराव बागूल, रा. र. बोराडे, आनंद यादव यासारख्या अनेक साहित्यिकांनी दर्जेदार साहित्यनिर्मिती केली आहे. तसेच आत्तापर्यंत तीन साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. आज जगात मराठी ही दहाव्या क्रमांकाची भाषा आहे.१४ ते १५ कोटी लोक या भाषेचे आहेत. या भाषेत दरवर्षी २०० साहित्य संमेलन भरतात. तीन हजार ग्रंथ निर्मिती होते. दहा कोटी लोक या ग्रंथाचे वाचन करतात. त्यामुळे वैभवशाली भाषा, साहित्य व संस्कृतीची परंपरा असलेल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणारच असे ते म्हणाले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष परमेश्वर कदम, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, पाटील एम बी, डॉ. काळे बी. एम., डॉ. सोनसळे एस. डी. प्रा.सखाराम कदम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व भाषा प्रेमींनी यात सहभाग नोंदवला.

पुण्य नगरी

# मराठी भाषा संवर्धनाचे दायित्व मराठी भाषिकांचेच : अ‍ॅड. राजेंद्र लातूरकर

**लातूर / प्रतिनिधी**

मराठी ही आपली मातृभाषा आहे. माता, मातृभूमी आणि मातृभाषा या प्रत्येक माणसाला पूजनीय अशा गोष्टी आहेत. मराठी ही मराठी माणसाची महत्त्वाची आदान-प्रदानाची भाषा आहे. मराठी माणूस प्रारंभी विशेषत्वाने मराठी भाषेतूनच अभिव्यक्त होतो. भाषा समृद्ध केली, तर मराठी माणूसही समृद्ध होतो. म्हणून भाषा संवर्धन व विकसनाचे दायित्व हे मूलतः मराठी भाषकांचेच आहे, असे प्रतिपादन मराठी साहित्याचे अभ्यासक अ‍ॅड. राजेंद्र लातूरकर यांनी केले.

देवणी येथील कै. रसिका महाविद्यालयातील मराठी विभागाने मराठी भाषा दिनानिमित्त आभासी पद्धतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आरंभी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. आपल्या व्याख्यानात पुढे बोलताना अ‍ॅड. राजेंद्र लातूरकर म्हणाले की, मराठी भाषा ही मराठी माणसाला आपल्या प्राणाहून प्रिय आहे. भारतीय संत-महात्मे, समाजसुधारक, साहित्य अभ्यासक, राजकारणी व मराठीतर अभ्यासकांनीही मराठीची थोरवी गायिली असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केला.

कार्यक्रमास संभाजी महाविद्यालय मुरुड येथील प्रा. महेंद्र आल्टे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. महेंद्र आल्टे यांनी केले. कार्यक्रमास क्षेत्रीय शिक्षण संस्थान भोपाळ येथील भाषा अभ्यासक प्रा. डॉ. नितीन रामटेके, प्रा. डॉ. शिवहार विभुते, प्रा. डॉ. रामशेट्टी शेटकार, प्रा. डॉ. पी. आर. मोरे, प्रा. अंकुश भास्कर, प्रा. डॉ. गोपाल सोमाणी, प्रदीप मोरे, दयानंद रणदिवे आदिंची उपस्थिती होती.

**Smart Latur**
Page No 3 February 28, 2022

# देशोन्नती

# भाषा संवर्धन व विकसनाचे दायित्व मराठी भाषकांचेच

## ॲड. राजेंद्र लातूरकर यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ▪ मराठी ही आपली मातृभाषा आहे. माता, मातृभूमी आणि मातृभाषा या प्रत्येक माणसाला पूजनीय अशा गोष्टी आहेत. मराठी ही मराठी माणसाची महत्त्वाची आदान-प्रदानाची भाषा आहे. मराठी माणूस प्रारंभी विशेषत्वाने मराठी भाषेतूनच अभिव्यक्त होतो. भाषा समृद्ध केली, तर मराठी माणूसही समृद्ध होतो .म्हणून भाषा संवर्धन व विकसनाचे दायित्व हे मूलतः मराठी भाषकांचेच आहे,असे प्रतिपादन मराठी साहित्याचे अभ्यासक ॲड. राजेंद्र लातूरकर यांनी केले.

देवणी येथील कै.रसिका महाविद्यालयातील मराठी विभागाने मराठी भाषा दिनानिमित्त आभासी पद्धतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.शिवाजी सोनटक्के हे उपस्थित होते.

सर्व प्रथम कार्यक्रमाच्या आरंभी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमास क्षेत्रीय शिक्षण संस्थान भोपाळ येथील भाषा अभ्यासक प्रा. डॉ. नितीन रामटेके, संभाजी महाविद्यालय मुरुड येथील प्रा.महेंद्र आल्टे,प्रा डॉ. शिवहार विभुते, प्रा. डॉ. रामशेट्टी शेटकार, प्रा. डॉ. पी. आर. मोरे, प्रा. अंकुश भास्कर ,प्रा. डॉ. गोपाल सोमाणी, प्रदीप मोरे, दयानंद रणदिवे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी आभासी पद्धतीने मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



आपल्या व्याख्यानात पुढे बोलताना ॲड.राजेंद्र लातूरकर म्हणाले की, मराठी भाषा ही मराठी माणसाला आपल्या प्राणाहून प्रिय आहे. भारतीय संत-महात्मे, समाजसुधारक, साहित्य अभ्यासक, राजकारणी व मराठीतर अभ्यासकांनीही मराठीची थोरवी गायिली आहे. भारतीय संतांबरोबरच रे.ना.वा. टिळक , फादर स्टीफन्सन यांनीही मराठीची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. अडीच हजार वर्षांपासून उत्क्रांत होत होत आज आपली मराठी विकसनाच्या उच्चतम पातळीवर येऊन ठेपली आहे. आपल्या मराठीने हिंदी, गुजराती,कानडी अशा भारतीय भाषांबरोबरच इंग्रजी भाषेतील शब्दधन स्वीकारले आहे. त्याचबरोबर मराठी भाषकांच्या साहचर्य व प्रभावाने इंग्रजी शब्दकोशामध्ये मराठीतील असंख्य शब्द समाविष्ट झालेले आहेत. हा मराठी भाषा व मराठी भाषकांचा गौरवच आहे. जगभरात मराठी भाषक माणूस व्यवसाय, पर्यटन व नोकरीच्या निमित्ताने भ्रमंती करीत आला आहे .म्हणून जगात जिथपर्यंत मराठी माणूस जातो तिथपर्यंत तो मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करतो व भाषा संवर्धनामध्ये आपला क्रियाशील सहभाग नोंदवतो.म्हणून विद्यमान मराठी भाषा विकसनाच्या सर्वोच्च शिखरावर प्रतिष्ठित करावयाची असेल तर सर्वांनी मराठीला प्राधान्य देऊन आपले सर्व जीवनव्यवहार हे मराठीतूनच करावयास हवेत ,असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी मराठी ही आपली मातृभाषा आहे आणि म्हणून आपण आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठीला अग्रक्रम द्यावा .यामुळे आपले विचार सर्वांपर्यंत पोहोचतील .एवढेच नसून सर्वांमध्ये मराठी विषयाची गोडी निर्माण होईल व स्वाभाविकच भाषा संवर्धन व विकसन घडून येईल असे त्यांनी आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रशांत मंडे यांनी केले.

> ॲड. राजेंद्र लातूरकर म्हणाले की, मराठी भाषा ही मराठी माणसाला आपल्या प्राणाहून प्रिय आहे. भारतीय संत-महात्मे, समाजसुधारक, साहित्य अभ्यासक, राजकारणी व मराठीतर अभ्यासकांनीही मराठीची थोरवी गायिली आहे. भारतीय संतांबरोबरच रे. ना.वा. टिळक , फादर स्टीफन्सन यांनीही मराठीची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे.

Deshonnati Edition
Mar 1, 2022 Page No. 9
Powered By : eMalaka.com

लातूर, सोमवार, दि. 28 फेब्रुवारी 2022 साप्ताहिक

# भाषा संवर्धन व विकसनाचे दायित्व मराठी भाषकांचेच!

## ॲड. राजेंद्र लातूरकर यांचे प्रतिपादन

**देवणी/प्रतिनिधी :** मराठी ही आपली मातृभाषा आहे. माता, मातृभूमी आणि मातृभाषा या प्रत्येक माणसाला पूजनीय अशा गोष्टी आहेत. मराठी ही मराठी माणसाची महत्त्वाची आदान-प्रदानाची भाषा आहे. मराठी माणूस प्रतंभी विशेषत्वाने मराठी भाषेतूनच अभिव्यक्त होतो. भाषा समृद्ध केली, तर मराठी माणूसही समृद्ध होतो. म्हणून भाषा संवर्धन व विकसनाचे दायित्व हे मूलतः मराठी भाषकांचेच आहे, असे प्रतिपादन मराठी साहित्याचे अभ्यासक ॲड. राजेंद्र लातूरकर यांनी केले.

देवणी येथील कै. रसिका महाविद्यालयातील मराठी विभागाने मराठी भाषा दिनानिमित्त आभासी पद्धतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आरंभी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. आपल्या व्याख्यानात पुढे बोलताना ॲ.राजेंद्र लातूरकर म्हणाले की, मराठी भाषा ही मराठी माणसाला आपल्या प्राणाहून प्रिय आहे. भारतीय संत-महात्मे, समाजसुधारक, साहित्य अभ्यासक, राजकारणी व मराठीतर अभ्यासकांनीही मराठीची थोरवी गायिली आहे. भारतीय संतांबरोबरच रे. ना.वा. टिळक, फादर स्टीफन्सन यांनीही मराठीची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. अडीच हजार वर्षांपासून उत्क्रांत होत होत आज आपली मराठी विकसनाच्या उच्चतम पातळीवर येऊन ठेपली आहे. आपल्या मराठीने हिंदी, गुजराती, कानडी अशा भारतीय भाषांबरोबरच इंग्रजी भाषेतील शब्दधन स्वीकारले आहे. त्याचबरोबर मराठी भाषकांच्या साहचर्य व प्रभावाने इंग्रजी शब्दकोशामध्ये मराठीतील असंख्य शब्द समाविष्ट झालेले आहेत. हा मराठी भाषा व मराठी भाषकांचा गौरवच आहे. जगभरात मराठी भाषक माणूस व्यवसाय, पर्यटन व नोकरीच्या निमित्ताने भ्रमंती करीत आला आहे. म्हणून जगात जिथपर्यंत मराठी माणूस जातो तिथपर्यंत तो मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करतो व भाषा संवर्धनामध्ये आपला क्रियाशील सहभाग नोंदवतो. म्हणून विद्यमान मराठी भाषा विकसनाच्या सर्वोच्च शिखरावर प्रतिष्ठित करावयाची असेल, तर सर्वांनी मराठीला प्राधान्य देऊन आपले सर्व जीवनव्यवहार हे मराठीतूनच करावयास हवेत, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी मराठी ही आपली मातृभाषा आहे आणि म्हणून आपण आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठीला अग्रक्रम द्यावा, यामुळे आपले विचार सर्वांपर्यंत पोहोचतील. एवढेच नसून सर्वांमध्ये मराठी विषयाची गोडी निर्माण होईल व स्वाभाविकच भाषा संवर्धन व विकसन घडून येईल, असे त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमास संभाजी महाविद्यालय मुरुड येथील प्रा. महेंद्र आल्टे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रशांत भंडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. महेंद्र आल्टे यांनी केले.

या कार्यक्रमास क्षेत्रीय शिक्षण संस्थान भोपाळ येथील भाषा अभ्यासक प्रा. डॉ. नितीन रामटेके, प्रा डॉ. शिवहार चिमुते, प्रा. डॉ. रामलेट्टी शेटकार, प्रा. डॉ. पी. आर. मोरे, प्रा. अंकुश भास्कर, प्रा. डॉ. गोपाल सोमाणी, श्री. प्रदीप मोरे, श्री. दयानंद रणदिवे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी आभासी पद्धतीने मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

Janseva Sevabhavi Pratishthan Bhopni's

# Kai . Rasika Mahavidyalaya, Deoni

Tq. Deoni Dist.Latur

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.)

(Science, Commerce & Technology)

www.kairasikamahavidyalaya.com

NAAC Accredited 'B' Grade (UGC 2f &12B)

Establishment Year: June 2008

College Code – 399

Reg.No. MAHA/8734 / Date- 07-11-1998

Email:rasikadeoni399@gmail.com

## One Day National Conference : 'साहित्य समीक्षा व मराठी साहित्य'

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Name of the Department | : | Marathi |
| 2 | Complete name / title of the Activity | : | One Day National Conference 'साहित्य समीक्षा व मराठी साहित्य' |
| 3 | Dates or Duration (from-to) | : | 11-02-2023 |
| 4 | Venue of the Event | : | Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni |
| 5 | Sponsor/Collaborations (if any) | : | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded |
| 6 | Level of the event (encircle) | : | National |
| 7 | Purpose/aim/objective and outcome of the event | : | Research and Litreary Criticism |
| 8 | Beneficiaries/participants | : | Research Students, Lecturer and Research Guide |
| 9 | Other major staff/student/Institution involved in the organization of the activity | : | Principal Teaching Staff and Students |
| 10 | Any other information/comment /qualitative remarks | : | |
| 11 | Photographs (with captions) submitted (number) | : | 4 |
| 12 | Evidence produced (Certificate, letters, newspaper cuttings etc.) | : | Brochure of the Conference, photos, list of participants and Paper News |
| 13 | Name and Signature of Coordinator | : | Dr. Prashant Bhande, Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni |

Head of Department

IQAC- Coordinator
IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Princpal
Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित,**
**जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी द्वारा, संचलित**
**कै. रसिका महाविद्यालय, देवणी जि. लातूर**
**एक दिवसीय राष्ट्रीय परिषद**
**One Day National Conference**
( दि.११-०२-२०२३, वार : शनिवार )
**साहित्य समीक्षा व मराठी साहित्य**

## कार्यक्रम अहवाल

जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी द्वारा संचलित कै. रसिका महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात सातत्याने नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवले पाहिजेत, संशोधन कार्य केले पाहिजे. या हेतूने राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भाषा सदृढ होण्यासाठी अशा परिषदेची आवश्यकता आहे. इतर विषयापेक्षा मराठी भाषेमध्ये चर्चासत्र घेणे हे अत्यंत अवघड आहे परंतु हे काम या महाविद्यालयाने यशस्वीपणे केले. असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी केले. कै. रसिका महाविद्यालयातील मराठी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'साहित्य समीक्षा व मराठी साहित्य' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. गोविंदरावजी भोपणीकर साहेब उपस्थित होते. या परिषदेचे बीजभाषक म्हणून डॉ.पी. विठ्ठल (सदस्य, मराठी अभ्यास मंडळ स्वा.रा.ती.म विद्यापीठ,नांदेड), प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू मधुकर गायकवाड, संस्थासचिव मा. श्री. गजाननजी भोपणीकर साहेब, प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, समन्वयक डॉ. प्रशांत भंडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ.प्रशांत भंडे यांनी परिषदेच्या आयोजनामागची भूमिका विषद केली. लेखक वाचक आणि समीक्षक या तीन घटकांनी मिळून साहित्य व्यवहार परिपूर्ण होत असतो. या तिन्ही घटकांना एकत्र साधण्याचे काम या परिषदेच्या माध्यमातून केले आहे. या परिषदेसाठी महाराष्ट्र,तेलंगणा कर्नाटक या राज्यातून १४० हून अधिक शोधनिबंध प्राप्त झाले असून हा एक उच्चांक असल्याचे प्रतिपादन केले. हे शोध निबंध स्मरणिकेच्या तीन खंडामधून प्रकाशित केले जाणार असल्याची माहिती त्यांनी प्रास्ताविकातून दिली.

Scanned with OKEN Scanner

या परिषदेचे बीज भाषण डॉ.पी. विठ्ठल यांनी केले. यावेळी ते म्हणाले की, समीक्षेमुळे वाचकांचा नवीन वाङ्मयीन दृष्टिकोन तयार होतो. साहित्य समीक्षा ही अंतिमतः मानवी संस्कृतीची समीक्षा असते. समीक्षेमुळे वाचकांची अभिरुची समृद्ध होते. आजच्या काळात गंभीर साहित्य समीक्षा नाहीशी होत आहे. आजकाल समीक्षकाला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागत असल्याची खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली. सांस्कृतिक व्यवहाराला समृद्ध करणारे लेखक आपल्याकडे खूप आहेत, पण त्या लेखकांची गंभीरपणे नोंद घेणारा समीक्षा वर्ग अल्प प्रमाणात आहे. ज्या समाजात समीक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे तो सांस्कृतिक व्यवहार निकोप होत असतो, जोपर्यंत आपण आपल्या लेखकांना समजून घेणार नाही तोपर्यंत आपले लेखक आपली कक्षा ओलांडून अन्य भाषेत लेखन करू शकणार नाहीत म्हणून अशा लेखकांना समीक्षकांनी आधार देण्याची आवश्यकता आहे. साहित्य समीक्षा ही पूर्वग्रह दूषित नसावी. तटस्थपणे सांस्कृतिक व्यवहार समजून घेणाऱ्या समीक्षकाची आज गरज आहे असे ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर (मराठी विभाग प्रमुख, दयानंद कला महाविद्यालय, लातूर) यांनी रसिका महाविद्यालयाने ग्रामीण भागामध्ये परिषद घेणे हे अत्यंत अवघड कार्य उत्तमपणे केले आहे, असे प्रतिपादन करून परिषदेच्या माध्यमातून साहित्याच्या चिंतकांना एकत्र केल्याबद्दल प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांचे कौतुक केले. स्वा. रा. ती. म. विद्यापीठाचे माजी कुलगुरू मधुकर गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात 'साहित्य समीक्षा व मराठी साहित्य' या शोधनिबंध स्मरणिकेचे प्रकाशन मा. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. गोविंदरावजी भोपणीकर साहेब उपस्थित होते. त्यांनी या महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण सुविधा आणि प्राध्यापकांच्या दर्जेदार संशोधनासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे. असे प्रतिपादन केले. तसेच या परिषदेसाठी उपस्थित सर्व प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या.

मा. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या शुभ हस्ते स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या प्रा. डॉ पी. विठ्ठल, प्रा. डॉ कांत जाधव, प्रा. डॉ. संजय बालाघाटे यांचा सत्कार करण्यात आला. या परिषदेतील दोन सत्रांमध्ये महाराष्ट्रातील अनेक भागातून उपस्थित असलेल्या संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी शोधनिबंधाचे वाचन केले. पहिल्या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. अंकुशकुमार चव्हाण(लातूर) व दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. तुषार चांदवडकर (नाशिक)यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुलोचना डेंगाळे यांनी केले. आभार डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी व्यक्त केले.

परिषदेचा समारोप कार्यक्रम संस्थासचिव मा. श्री. गजाननजी भोपणीकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये घेण्यात आला. परिषदेत सहभागी सर्व संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन

Scanned with OKEN Scanner

सन्मान करण्यात आला. यावेळी परिषदेत सहभागी प्राध्यापकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिक्रिया दिल्या. यावेळी प्रा.अंगद भुरे म्हणाले, "प्रत्येक संशोधकांमध्ये उत्सुकता निर्माण करणे आणि त्यांना प्रेरणा देण्याचे काम या परिषदेने केले आहे. या परिषदेसाठी १४० शोधनिबंध प्राप्त होणे हे एक आश्चर्य आहे. ही परिषदेच्या यशाची खूप मोठी बाब आहे." प्रा. डॉ. बालाजी भंडारे म्हणाले, "महाविद्यालयाच्या नावातच रसिका आहे. इथल्या सर्व प्राध्यापकांनी प्रत्येक कामात रस घेऊन काम केले आहे. उत्तम आदरातिथ्य केले. सर्वच बाबतीत योग्य नियोजन केले.म्हणून ही परिषद सर्व गोष्टींमध्ये अतिशय उत्तम ठरली आहे. आमच्या पुढे परिषदेचे आयोजन कसे करावे याचा आदर्श या परिषदेतून आम्हाला मिळाला आहे. या परिषदेत प्राप्त झालेले १४० लेख हे प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांच्या वैयक्तिक कार्याचे फलित आहे. इथे सर्व वक्ते चांगले आहेत. त्यांनी अत्यंत उत्कट विचार मांडले आहेत आणि यातून ज्ञानाची ज्योत जागृत करण्याचे काम या परिषदेने केले आहे."

प्रा. राजू मोरे, - "ग्रामीण भागामध्ये राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करणे हे अत्यंत कठीण काम आहे पण ते काम अतिशय उत्तमपणे या महाविद्यालयाने केले आहे. या परिषदेचे अत्यंत देखणे रूप इथे आम्हाला पाहायला मिळाले."

समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी केले. ही परिषद यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सहकारी मित्र प्रा. डॉ. विजयकुमार मोरे, प्रा. डॉ. सुदर्शन पेडगे, प्रा. डॉ. वैशाली चटगे, प्रा. डॉ. सुलोचना डेंगाळे, प्रा. डॉ. महादेव टेकाळे, प्रा. डॉ. अंकुश भुसावळे, प्रा. डॉ. सचिन चामले, प्रा. डॉ. रेणुका कुणाळे, प्रा. डॉ. अंकुश भास्कर, डॉ. शिवाजी सोनटक्के, प्रा. डॉ. पी आर मोरे, प्रा. डॉ. योगेश मुळे, प्रा. डॉ. गोपाल सोमाणी या सर्वांनी या परिषदेस मोलाचे सहकार्य केले. सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोलाचे योगदान दिले.

प्रा. डॉ. प्रशांत भंडे,
मराठी विभागप्रमुख

प्राचार्य
डॉ. चंद्रकांत जावळे
Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC PLANNING & DEVELOPMENT SECTION

Fax: (02462) 215572
Phone: (02462)215542

Website: srtmun.ac.in
E-mail: apds@srtmun.ac.in

कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी उपस्थित राहणा—या संबधित शिक्षकांना कार्यरजे बाबत.

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये सर्व संबधितास कळविण्यात येते की, मा. प्राचार्य, कै. रसिका महाविद्यालय, देवणी ता.देवणी जि. लातूर येथील महाविद्यालयालयाच्या वतीने मराठी विभागाच्या वतीने आयोजित ''साहित्य समीक्षा व मराठी साहित्य'' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

सदरील राष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहणाऱ्या सर्व संबंधित शिक्षकांना त्या त्या महाविद्यालयाच्या वतीने दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजीची कर्तव्य रजा (Duty Leave) मंजूर करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड
ज.क्र. शैनिविवि/परीपत्रक/२०२१—२२/882
दिनांक : ०९/०२/२०२३
विभाग

सहा.कुलसचिव
शैक्षणिक नियोजन व विकास

प्रत :

१. मा. प्राचार्य, कै. रसिका महाविद्यालय, देवणी ता.देवणी जि. लातूर यांना प्रत देवून कळविण्यात येते की, उक्त राष्ट्रीय परिषदेस सहभागी होणाऱ्या संबंधितांना आपल्या स्तरावरून स्वतंत्रपणे कळविण्यात यावे,
२. सिस्टिम एक्सपर्ट, प्रस्तूत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावे.

देशोन्नती लातूर, गुरुवार, दि. १६ फेब्रुवारी २०२३ २ माझं शहर

# नवीन शैक्षणिक धोरणात भाषा सदृढ होण्यासाठी परिषदेची आवश्यकता

## कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ■ नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भाषा सदृढ होण्यासाठी अशा परिषदेची आवश्यकता आहे. इतर विषयापेक्षा मराठी भाषेमध्ये चर्चासत्र घेणे हे अत्यंत अवघड आहे. परंतु हे काम या महाविद्यालयाने यशस्वीपणे केले. असे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.उद्धव भोसले यांनी केले.

देवणी येथील कै.रसिका महाविद्यालयातील मराठी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'साहित्य समीक्षा व मराठी साहित्य' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. या राष्ट्रीय , परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर उपस्थित होते. या परिषदेचे बीजभाषक म्हणून स्वा.रा.ती.म विद्यापीठ,नांदेड मराठी अभ्यास मंडळ सदस्य डॉ.पी. विठ्ठल प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू मधुकर गायकवाड,



संस्थासचिव गजानन भोपणीकर, प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, समन्वयक डॉ. प्रशांत मंडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. प्रशांत मंडे यांनी परिषदेच्या आयोजनामागची भूमिका विषद केली. लेखक वाचक आणि समीक्षक या तीन घटकांनी मिळून साहित्य व्यवहार परिपूर्ण होत असतो. या तिन्ही घटकांना एकत्र साधण्याचे काम या परिषदेच्या माध्यमातून केले आहे. या परिषदेसाठी महाराष्ट्र,तेलंगणा कर्नाटक या राज्यातून १४० हून अधिक शोधनिबंध प्राप्त झाले असून हा एक उच्चांक असल्याचे स्पष्ट केले. हे शोध निबंध स्मरणिकेच्या तीन खंडामधून प्रकाशित केले जाणार असल्याची माहिती त्यांनी प्रास्ताविकातून दिली.

या परिषदेचे बीज भाषण डॉ.पी. विठ्ठल यांनी करताना समीक्षेमुळे वाचकांचा नवीन वाङ्मयीन दृष्टिकोन तयार होतो. साहित्य समीक्षा ही अंतिमतः मानवी संस्कृतीची समीक्षा असते. समीक्षेमुळे वाचकांची अभिरुची समृद्ध होते. आजच्या काळात गंभीर साहित्य समीक्षा नाहीशी होत आहे. आजकाल समीक्षकाला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागत असल्याची खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली. सांस्कृतिक व्यवहाराला समृद्ध करणारे लेखक आपल्याकडे खूप आहेत, पण त्या लेखकांची गंभीरपणे नोंद घेणारा समीक्षा वर्ग अल्प प्रमाणात आहे. ज्या समाजात समीक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे तो सांस्कृतिक व्यवहार निकोप होत असतो, जोपर्यंत आपण आपल्या लेखकांना समजून घेणार नाही तोपर्यंत आपले लेखक आपली कक्षा ओलांडून अन्य भाषेत लेखन करू शकणार नाहीत. म्हणून अशा लेखकांना समीक्षकांनी आधार देण्याची आवश्यकता आहे. साहित्य समीक्षा ही पूर्वग्रह दूषित नसावी. तटस्थपणे सांस्कृतिक व्यवहार समजून घेणाऱ्या समीक्षकाची आज गरज आहे असे ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर (मराठी विभाग प्रमुख, दयानंद कला महाविद्यालय, लातूर) यांनी रसिका महाविद्यालयाने ग्रामीण भागामध्ये परिषद घेणे हे अत्यंत अवघड कार्य उत्तमपणे केले आहे, असे परिषदेच्या माध्यमातून साहित्याच्या चिंतकांना एकत्र केल्याबद्दल प्रा.डॉ. प्रशांत मंडे यांचे कौतुकही केले.

स्वा. रा. ती. म. विद्यापीठाचे माजी कुलगुरू मधुकर गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या परिषदेतील दोन सत्रांमध्ये महाराष्ट्रातील अनेक भागातून उपस्थित असलेल्या संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी शोधनिबंधाचे वाचन केले.

या कार्यक्रमात 'साहित्य समीक्षा व मराठी साहित्य' या शोधनिबंध स्मरणिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोविंदराव भोपणीकर उपस्थित होते. त्यांनी या महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण सुविधा आणि प्राध्यापकांच्या दर्जेदार संशोधनासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन केले. तसेच या परिषदेसाठी उपस्थित सर्व प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या प्रा. डॉ. पी. विठ्ठल, प्रा. डॉ. कांत जाधव, प्रा. डॉ. संजय बालाघाटे यांचा सत्कार करण्यात आला.

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur




स्वामी रामानंद तीर्थ व  आबासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीप प्रज्वलन करून प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून कुलगुरू डॉ. उद्धव भोसले साहेब उपस्थित होते.




कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. गोविंदरावजी भोपणीकर साहेब यांच्या शुभहस्ते परिषदेचे उद्घाटक कुलगुरू डॉ. उद्धव भोसले साहेब यांचा सत्कार करण्यात आला.

प्रा.डॉ.प्रशांत भंडे
मराठी विभाग प्रमुख
कै.रसिका महाविद्यालय, देवणी

Principal
Kai.Rasika Mahavidyalaya,Deoni
Tq.Deoni Dist.Latur



उद्घाटन कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. उद्धव भोसले सर



परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांचा संस्था अध्यक्ष व कुलगुरू डॉ. उद्धव भोसले साहेब यांच्या शुभ हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

Principal
Kai.Rasika Mahavidyalaya,Deoni
Tq.Deoni Dist.Latur



"साहित्य समीक्षा व मराठी साहित्य" या शोध निबंधाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.



राष्ट्रीय परिषदेचे बीजभाषक प्रा. डॉ. पी.विठ्ठल परिषदेचे बीजभाषण करताना.

Principal
Kai.Rasika Mahavidyalaya,Deoni,
Tq.Deoni Dist.Latur




उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. गोविंदरावजी भोपणीकर साहेब अध्यक्षीय विचार व्यक्त करताना




संशोधक विद्यार्थिनी तनुजा ढेरे शोधनिबंधाचे वाचन करताना

Principal
Kai.Rasika Mahavidyalaya,Deoni
Tq.Deoni Dist.Latur



शोध निबंधाचे वाचन करताना प्रा. डॉ. बालाजी भंडारे



शोधनिबंध वाचनाच्या पहिल्या सत्राचे सत्राध्यक्ष प्रा. डॉ. अंकुश कुमार चव्हाण विचार व्यक्त करताना.

Principal
Kai.Rasika Mahavidyalaya,Deoni
Tq.Deoni Dist.Latur




शोधनिबंध वाचनाच्या दुसऱ्या सत्राचे सत्राध्यक्ष प्रा. डॉ. तुषार चांदवडकर विचार व्यक्त करताना.




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल प्रा. डॉ. कांत जाधव यांचा मा. कुलगुरू साहेबांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला.

Principal
Kai.Rasika Mahavidyalaya,Deoni
Tq.Deoni Dist.Latur



राष्ट्रीय परिषदेच्या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थासचिव मा. श्री. गजाननजी भोपणीकर साहेब यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे सर



राष्ट्रीय परिषदेसाठी उपस्थित प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी.

प्रा.डॉ.प्रशांत भंडे
मराठी विभाग प्रमुख
कै.रसिका महाविद्यालय, देवणी

Principal
Kai.Rasika Mahavidyalaya,Deoni
Tq.Deoni Dist.Latur

JANSEVA SEVABHAVI PRATISTHAN, BHOPANI`s

# Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni. Dist: Latur

## Department of Marathi



**Activities Name:** one day National Conference "साहित्य समीक्षा व मराठी साहित्य" **Date:** 11-Feb-2023

| Sr.No. | Name of the Students | Class | Signature |
|---|---|---|---|
| 1) | बिरादार विश्वजीत राजकुमार | B.com. F.y | vishwajit |
| 2) | mane chetan Jaysing | B.com F.y | Chetan |
| 3) | shinde Aastha sushil | B.com F.y | Aastha |
| 4) | survase Diksha sanjay | B.com f.y | Diksha |
| 5) | Jadhav Priyanka Bibhishan | B.com.s.y | Priyanka |
| 6) | swami Bhagyashri Virbhadra | B.com.s.y. | Bhagyashri |
| 7 | Kamble swapnil narsing | B.com.SY | [illegible] |
| 8) | Sante shivlila umakant | B.sc. f.y | shivlila |
| 9) | patil kanchan Gautam | B.sc.f.y | kanchan |
| 10) | Udgire Manoj Dhanaji | B.sc.f.y | Manoj |
| 11) | sagare Rutuja Anil | B.sc. F.y | Rutuja |
| 12) | modi mohan Dhondiram | B.com.f.y. | mohan |
| 13 | Bobade Krushna Dhondiba | B.com f.y | Krushna |
| 14) | Tawade Mahadev vyankatrao | B.S.C. SY. | mahadev. |
| 15] | kewade charan Baliram | B.SC FY | charan. |
| 16] | Biradar Gayatri Balaji | B.sc.sy. | Gayatri |
| 17 | Shaikh Anbaj mobinsab | B.sc.sy | Anbaj |
| 18) | pasarkalle Aarati Balaji | B.sc FY | Aarati |
| 19) | Dhotre mangesh Balaji | B.com fy | mangesh |
| 20) | Tondare Savita Sholanath | B.com fy | Savita |
| 21) | patil vaishali somnath | B.sc.F.Y | vaishali |
| 22) | Ghumade Ashwini Ramchandra | B.sc f.y | Ashwini |
| 23) | Soundale Revati Dilip | B.sc fy | Revati. |
| 24) | shaikh sameer mobin | B.sc. F.Y | Sameer |

JANSEVA SEVABHAVI PRATISTHAN, BHOPANI`s

## Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni. Dist: Latur

② 

## Department of Marathi

**Activities Name:**

**Date:** 11 Feb 2023

| Sr.No. | Name of the Students | Class | Signature |
|---|---|---|---|
| 25 | Antereddy sachin shivaji | B.SC. S.Y | Sachin |
| 26. | Rathod Sagar pandurang | B.com.F.y | Sagar. |
| 27 | Shinde shweta sushil | B.com.f.y | shweta. |
| 28 | Bhosale Naresing Mukind | B.com.Fy | Naresing |
| 29) | Alpe Govind Netaji | B.Com.Sy | Giovind |
| 30) | puri mahesh satish | B.com.sy | Mahesh |
| 31) | Dhatte Ravindra sudhakar | B.Com.S.Y | Ravindra |
| 32) | Patil Hemant Anant | B.Com.SY | Hemant |
| 33) | Jadhav Vaishnavi Bhagvat | B.com.sy | Vaishnavi |
| 34) | Takle pravin Hanmant | B.com.sy | pravin |
| 35) | pashime Amar Shriniwas | B.com.sy | Amar. |
| 36) | suvarnkar sangeeta vilas | B.com.s.y | Sangeeta. |
| 37) | koyle vishnu Pandurang | B.comsy | vishnu. |
| 38) | Biradar Abhishek Madhukar | B.com sy | [signature] |
| 39) | Biradar Dnyaneshwar venkatrao | B.com sy | Dany |
| 40) | Mhetre mahesh gorakh | B Com fy | Mahesh |
| 41) | Jadhav Gajanan Madhav | B.sc.f.y | Jadhav |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

प्रा.डॉ.प्रशांत मंडे
मराठी विभाग प्रमुख
के.रसिका महाविद्यालय, देवणी

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur